रयत शिक्षण संस्था, सातारा

इयत्ता - 7 वी | **प्रथम सत्र परीक्षा 2022 -23** | गुण - 50

वेळ- 2.30 तास | **विषय - सामान्य विज्ञान** | पेजेस- 2

**सूचना:-** 1) सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.
2) उजवीकडील अंक प्रश्नांचे गुण दर्शवितात.
3) आवश्यक तेथे आकृत्या काढाव्यात.
4) प्रश्नांची उत्तरे निळ्या किंवा काळ्या शाईच्या पेनाने लिहावीत.

**1. A) कंसात योग्य पर्याय निवडून रिकाम्या जागा भरा.** **4**

( प्रारण, उदासीन, दिशा, अदिश )

1) .......... मृदेचा $pH^7$ असतो

2) वस्तूमान ही ......... राशी आहे.

3) सूर्यापासून पृथ्वीला ........ मुळे उष्णता मिळते.

4) वेगाला परिमाण व ......... असते.

**B) योग्य जोड्या जुळवा.** **4**

| गट 'A' | गट 'B' |
| --- | --- |
| 1) सजातीय विद्युतप्रभार | a) हवाबंद पिशव्यामधील खाद्यपदार्थ |
| 2) हवा | b) अमरवेल |
| 3) परजीवी वनस्पती | c) प्रकाशाचे विकिरण |
| 4) नायट्रोजन वायू | d) प्रतिकर्षण |

**C) खालील विधाने चूक की बरोबर ते लिहा.** **2**

1) समुद्राचे पाणी विजेचे दुर्वाहक आहे.

2) आकाशात वीज कडाडत असताना पोहू नये

**2. A) व्याख्या लिहा. ( कोणतेही 2 )** **4**

1) स्वयंपोषण 2) उष्णतेचे वहन 3) वस्तुमान

**B) शास्त्रीय कारणे द्या. ( कोणतेही 3 )** **6**

1) बुरशी प्रकाश-संश्लेषण करु शकत नाही.

2) पाण्याला वैश्विक द्रावक म्हटले जाते.

3) $5^0$ सेल्सिअस तापमानाला अन्नपदार्थ सुरक्षित राहतात.

4) उंटाला 'वाळवंटातील जहाज' असे म्हणतात.

**3. A) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.** **4**

1) ढगातून पडणाऱ्या विजेच्या आघातापासून बचाव करण्यासाठी कोणते उपकरण वापरतात ?

2) मुळांचे दोन प्रमुख प्रकार कोणते ?

3) बेडूक पाण्यात असताना कशाद्वारे श्वसन करतो ?

4) SI पद्धतीत बलाचे एकक कोणते ?

**B) खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा. ( कोणतेही 3 )** 6

1) उष्णतेच्या संक्रमणाचे प्रकार कोणते ?
2) चाल काढण्याचे सूत्र व एकक कोणते ?
3) घर्षणामुळे विद्युतप्रभार निर्माण होणाऱ्या चार वस्तूंची नावे लिहा.
4) अन्न वाया जाऊ नये, अन्नाची नासाडी होऊ नये यासाठी तुमची भूमिका काय असेल ?
5) शाकाहारी प्राणी व मांसाहारी प्राणी यांच्यातील फरक स्पष्ट करा.

**4. A) सुबक व नामनिर्देशित आकृती काढा. ( कोणतेही 2 )** 4

1) विद्युतदर्शी 2) पानाचे विविध भाग 3) सोटमूळ

**B) गटातील वेगळा शब्द ओळखा.** 2

1) मीठ, व्हिनेगर, सायट्रिक आम्ल, सोडिअम बेन्झोएट
2) त्वरण, बल, वेग, चाल

**C) खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा. ( कोणतेही 2 )** 6

1) दिलेल्या माहितीच्या आधारे खालील तक्ता पूर्ण करा.

(वस्तुमान, सेकंद, m )

| राशी | एकाचे नाव | एकक चिन्ह |
|---|---|---|
| राशी | मीटर | .......... |
| .......... | किलोग्रॅम | Kg |
| काळ | .......... | S |

2) वीज कडाडत असताना तुम्ही काय दक्षता घ्याल ?
3) 20 किग्रॅ वस्तुमानाची गाडी सपाट व गुळगुळीत रस्त्यावरून 2N इतके बल लावल्यावर 50 मीटर सरळ रेषेत गेली, तेव्हा बलाने किती कार्य केले ?
4) अन्न प्रकारांनुसार वर्गीकरण करा.

(मानव, गाय, गिधाड, वाघ, शेळी, चिमणी)

| शाकाहारी | मांसाहारी | मिश्राहारी | स्वच्छताकर्मी |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |

**5. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा. ( कोणतेही 2 )** 8

1) मृदेचे विविध उपयोग कोणते ?
2) खालील प्रत्येकाची 2 - 2 नावे लिहा.

अ) एकच बी असणारी फळे - ब) पानांचे प्रकार -

क) फुलाचे विविध भाग - ड) द्विदल वनस्पती -

3) वनस्पतीतील प्रकाश संश्लेषण प्रक्रिया आकृतीच्या सहाय्याने स्पष्ट करा.
4) त्सुनामी म्हणजे काय ? त्सुनामीचे विघातक परिणाम कोणते ?